ePaper **पवारांना फडणवीसांची भीती वाटत होती: चंद्रशेखर बावनकुळे**



| वर्ष - 6 | अंक - 308 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- पहाटेच्या शपथविधीवर अखेर शरद पवारांनी मौन सोडलंय!
- चिंचवडमध्ये भगवे वादळ!
- ही लढाई आता फक्त शिवसेनेची नाही तर संविधानाला सुरक्षित ठेवण्यासाठी : आदित्य

www.mahaenews.com | गुरुवार , दि. 23 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी ते निगडी मेट्रोला हिरवा कंदील!

## मुख्यमंत्र्यांची घोषणा : शास्तीकर माफीचा 'जीआर' लवकरच

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

पिंपरी-चिंचवडमधील शास्तीकर माफीचा शासन आदेश लवकरच काढला जाईल. तसेच अनधिकृत बांधकामांसाठी यापुढे कोणताही मोर्चा काढावा लागणार नाही. हा प्रश्न ठाण्याप्रमाणे कायमचा निकालात काढला जाईल. तसेच प्राधिकरणाचा साडेबारा टक्के जमीन परताव्याचा विषयही सिडकोप्रमाणे तातडीने मार्गी लावणार आहे. तसेच पिंपरी ते निगडीपर्यंतच्या मेट्रो प्रकल्पाला मंजुरी देण्याची सूचना अधिकाऱ्यांना केली आहे. या शहरातील एकही प्रश्न प्रलंबित राहणार नाही ही जबाबदारी माझी असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २२) केली. माझ्या मुख्यमंत्री होण्यात भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचाही सिंहाचा वाटा, हिस्सा, सहभाग, प्रेम होते, अशा भावना व्यक्त करून पोटनिवडणुकीत भाजपच्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करण्याचे आवाहन केले.



> "दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे कर्तव्यदक्ष व जागरूक आमदार होते. त्यांनी केलेले काम येथे बोलते. त्यांच्या निधनानंतर मी अंत्यदर्शनासाठी आलो होतो. त्यावेळी हजारो लोकांच्या चेहऱ्यावर त्यांच्याच घरातील कोणी गेल्याचे दुःख दिसत होते. त्यांची किर्ती, त्यांचे काम सभेला असलेल्या जनतेच्या उपस्थितीवरून जाणवते. हीच त्यांच्या कामाची पोचपावती आहे. त्यांच्या हातून काही विकासकामे शिल्लक राहिली असतील. ती पूर्ण करण्यासाठी जनतेने त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या मागे उभे राहावे. त्यांचे राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी त्यांच्या पत्नीला साथ देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे.
> **- एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री.

चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजप, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष (आठवले गट), रासप, रयत क्रांती संघटना, शिवसंग्राम संघटना, प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारार्थ रहाटणी येथील शिवेंद्र लॉन्समध्ये आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, माझ्या मुख्यमंत्री होण्यामध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचा सिंहाचा वाटा, हिस्सा, सहभाग, प्रेम होते. दुर्दैवाने ते आज आपल्यामध्ये नाहीत. भाजप-शिवसेनेचे सरकार स्थापन होण्यापूर्वी झालेल्या निवडणुकीत आजारी असताना देखील दिवंगत लक्ष्मण जगताप मतदानासाठी मुंबईत आले होते. त्यातून पक्षावरील प्रेम, निष्ठा, जबाबदारी त्यांनी निभावली. माझ्या मनात त्यांच्याबद्दल आदर व प्रेम आहे. पण अशी वेळ येईल असे कुणालाही वाटले नव्हते.

नियतीसमोर आपण सगळे हतबल असतो. त्यांनी अनेक वर्षे चिंचवड मतदारसंघाची सेवा केली. लोकांना प्रेम दिले. कार्यकर्ते आणि मतदारांना स्वतःचा परिवार समजला. त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप या पोटनिवडणुकीत मतदारांचा आशिर्वाद घ्यायला उभ्या आहेत. ही निवडणूक बिनविरोध होईल असे आम्हाला वाटलेले. मुंबईतल्या पोटनिवडणुकीत अनेक नेत्यांनी आवाहन केले. विनंती केली होती. महाराष्ट्राचीही परंपरा सांगितली होती. स्वतः शरद पवार बोलले. राज ठाकरे यांनीही विनंती केली. मी स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितले की निवडणूक लढवायला नको.

### अनधिकृत बांधकामासाठी आता मोर्चा काढावा लागणार नाही...

» पिंपरी-चिंचवडमधील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शहरातील बांधकामांना लावण्यात आलेला शास्तीकर माफ करण्याचा निर्णय विधानसभेत घेतला आहे. त्याचा शासन आदेश तातडीने निघेल. अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नांवर आता मोर्चा काढावा लागणार नाही. हा प्रश्न ठाण्याप्रमाणे कायमचा निकालात काढला जाईल. सिडकोप्रमाणे प्राधिकरणाचा साडेबारा टक्क्याचा विषय तातडीने मार्गी लावला जाईल. पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल. इंद्रायणी, पवना नदी सुधार प्रकल्प आराखडा तयार करायला सांगितला आहे. पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रोला मंजुरी देण्याची सूचना केली आहे. पुणे रिंगरोड लवकरच सुरू करू, अशा घोषणा त्यांनी केल्या.

# प्रत्येक निवडणुकीत आता परिवर्तन निश्चित!

## शरद पवार यांचा विश्वास : चिंचवड पोटनिवडणुकीत प्रचार बैठका

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

देशातील यापुढील प्रत्येक निवडणुकीत परिवर्तन झालेले पाहायला मिळेल. जनता बेकारी आणि महागाईच्या मुद्द्यांनी त्रस्त झाली आहे. जनता परिवर्तनाला अनुकूल भूमिका घेईल. त्यामुळे नाना काटे यांचा विजय निश्चित असल्याचे निरीक्षण राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी नोंदवले..



रहाटणी येथे पत्रकार परिषदेत शरद पवार यांनी पोटनिवडणूक, पक्षाची राजकीय भूमिका, पिंपरी चिंचवडचा विकास आणि देशातील अराजकाच्या भूमिकेवर परखड भाष्य केले.

यावेळी ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे, उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे, प्रदेश युवकचे अध्यक्ष मेहबूब शेख, आमदार निलेश लंके, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख सचिन भोसले, ज्येष्ठ नेते आझम पानसरे, योगेश बहल, संजोग वाघेरे, प्रशांत शितोळे, मंगला कदम यांच्यासह अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी देशभरातील नेते गर्दी करत आहेत. पण नेत्यांच्या गर्दीने निवडणूक जिंकता येत नाहीत. नेत्यांच्या गर्दीत जनसामान्यांचा सहभाग किती हे महत्वाचे आहे. नेत्यांच्या गर्दीऐवजी निवडक शिलेदारांच्या मदतीने निवडणूक जिंकता येते. मी १४ निवडणुका लढवल्या यात एक दोन वेळाच प्रचारासाठी मला जावे लागले होते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### निवडणूक आयोगाला सूचना केल्याची शक्यता!

» यापूर्वी देशात काँग्रेस, समाजवादी पक्षात फूट पडली. पण अख्खा पक्ष चिन्हासकट एखाद्या गटाच्या झोळीत टाकण्याचा प्रयत्न यापूर्वी कधीच झाला नव्हता. त्यामुळे निवडणूक आयोगाला काही मार्गदर्शन झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पवार यांनी स्पष्ट केले. मी महाराष्ट्रात फिरत आहे. नेते जरी शिंदे यांच्यासह गेले असले तरी सामान्य कट्टर शिवसैनिक मात्र उध्दव ठाकरे यांच्यासोबत आहे. याची माहिती मी घेतली आहे. सत्तेचा गैरवापर करून शिवसेना फुटली, राजकीय पक्ष हिसकावून घेण्याचा प्रयत्न झाला. तांत्रिक मुद्द्यांचा बागूलबुवा करत लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरु आहे. लोक त्यांना धडा शिकवल्याखेरीज राहणार नाहीत. सध्या हा निर्णय न्यायालयाच्या कक्षेत आहे. न्यायालयावर आमचा विश्वास आहे. त्यावर मी अधिक भाष्य करणार नाही, असे पवार यांनी स्पष्ट केले.

# पहाटेच्या शपथविधीवर अखेर शरद पवारांनी मौन सोडलंच!

## विकासापेक्षा अर्थकारणाला महत्व वाढले आहे.

**। पुणे । महाईन्यूज ।**

**सन २०१९ मध्ये पहाटे सरकार बनविण्याचा एक प्रयत्न झाला. त्या प्रयत्नाचा फायदा एकच झाला. राष्ट्रपती राजवट उठली. असे काही घडले नसते तर राष्ट्रपती राजवट उठली असती का, राष्ट्रपती राजवट उठली नसती तर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले असते का? मी जे सांगितले ते समजणा-यांना समजते असे सूचक विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारासाठी पवार २२ फेब्रुवारी चिंचवडमध्ये आले होते. पिंपळेसौदागर येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. माजी मंत्री एकनाथ खडसे, माजी राज्यमंत्री अदिती तटकरे, आमदार निलेश लंके, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन भोसले उपस्थित होते.शरद पवार म्हणाले, सहसा मी पोटनिवडणुकीतील प्रचाराला जात नसतो. पण, एकेकाळी मला देशाच्या संसदेत पाठविण्यास या मतदारसंघाने हातभार लावला आहे. महाविकास आघाडी एकत्रित काम करत आहे. पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष असलो. तरी मी या जिल्ह्यातील आहे. येथून चारवेळा निवडून गेलो. लोकांशी माझे संबंध आहेत. भेटीगाठी होतात. यासाठी मी आलो आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये अलीकडच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस आणि आमच्या अन्य सहका-यांना हवे तसे यश मिळाले नाही. एक काळ असा होता महापालिका, अन्य संस्थामध्ये जनतेचा पाठिंबा आम्हा लोकांना होता. मधल्या काळात दोन निवडणुकांत एक वेगळे चित्र या ठिकाणी दिसले. बदल झाला; पण या बदला संबंधी सर्वसामान्य लोकांमध्ये अनुकूल अशी प्रतिक्रिया येत नाही. निवृत्त झालेल्या काही वरिष्ठ अधिका-यांनी वर्ष-दीड वर्षापूर्वी सांगितले होते की, या ठिकाणी शहराचे वाटप झाले आहे. विकासापेक्षा अर्थकारणाला महत्व वाढले आहे.

आम्ही येथील सत्ता नसताना निदान संघटनेची बांधणी महाविकास आघाडी म्हणून करू शकलो.



### सत्तेचा गैरवापर: शिवसेनेचे नाव, चिन्ह शिंदे यांना दिले

**सत्तेचा गैरवापर करुन एखादा राजकीय पक्ष, त्याची खून (चिन्ह) या सगळ्याच गोष्टी कोणी हिसकावून घेते किंवा पळवते हे कधी या देशात घडलेले नव्हते. पक्षामध्ये अंतर पडले. काँग्रेस आय आणि काँग्रेस एस असे दोन पक्ष झाले होते. काँग्रेस एसचा मी अध्यक्ष होतो. काँग्रेस आयच्या प्रमुख इंदिरा गांधी होत्या. त्यावेळेला काँग्रेस नाव वापरण्याचा मला अधिकार होता. नाव काढून घेतले नाही. त्यांनी हात घेतला आणि आम्ही घड्याळ घेतले. त्याला निवडणूक आयोगाने कधी अडविले नाही. इथे निवडणूक आयोगाचे वैशिष्ट्ये असे आहे की पक्षाचे नाव, चिन्ह हे सगळे दुस-याला देण्याचा निर्णय आजपर्यंत या देशाच्या इतिहासात कधी घडला नाही. पण, मला लोकांचा अनुभव आहे. ज्यावेळेला सत्तेचा अतिगैरवापर होतो. एखाद्या पक्षाला, नेतृत्वाला नाउमेद करण्याचा प्रयत्न होतो. त्यावेळेला लोक त्या पक्षाच्या मागे उभा राहतात. मला १०० टक्के खात्री आहे. लोकांशी बोलताना असे दिसते की नेते लोक शिवसेना सोडून गेले. पण, कट्टर शिवसैनिक १०० टक्के उद्धव ठाकरे यांच्याबरोबर आहे. हे ठिकठिकाणी दिसते. त्याची प्रचिती आगामी काळत येणा-या निवडणुकीत कळेल.**

### अध्यादेश निघत नाही तोपर्यंत

# आंदोलनावर ठाम

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यसेवेच्या वर्णनात्मक परीक्षा पद्धतीची अंमलबजावणी २०२५ पासून व्हावी, या मागणीसाठी उमेदवारांचे सलग तीसऱ्या दिवशीही आंदोलन चालू आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) राज्यसेवेत तुर्तास बदल करण्यात येणार नाही, असे परिपत्रक निघत नाही, तो पर्यंत आंदोलनावर ठाम राहणार असल्याचा निर्धार आंदोलक उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

आंदोलनाच्या तीसऱ्या दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, आम आदमी पार्टी, कॉंग्रेस आदींच्या कार्यकर्ते आणि नेत्यांनी पाठींबा दर्शविला. कॉंग्रेस आमदार आणि माजी मंत्री विजय वडेट्टीवार यानी विद्यार्थ्यींशी चर्चा केली आणि आंदोलनाला पाठींबा दर्शवला. तर बहुजन समाज पार्टीकडून आंदोलकांशी संपर्क साधण्यात आला व प्रशासकीय स्तरावर आवाज उठवला जाईल, असे अश्वासन महाराष्ट्र प्रभारी डॉ. चलवादी यांनी विद्यार्थ्यांना दिले. तसेच काँग्रेस आमदार कुणाल पाटील व शिरीष चौधरी यांनी सुद्धा आंदोलनाला भेट देत समर्थन दिले.



> **राज्यसेवेची वर्णनात्मक पद्धत २०२५ पासून लागू होणार. असा निर्णय घेत राज्यसरकार स्वतःची पाट थोपटून घेते. मात्र, अंमलबजावणीची वेळ आली तर घटनात्मक अडचणी सांगते. एमपीएससीला न विचारता असा अर्धवट निर्णय घेतला तरी कसा. एक प्रकारे विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचे काम राज्यसरकार करत आहे.**
>
> **- विजय वडेट्टीवार, माजी मंत्री, कॉंग्रेस**

# वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्षासह शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश!

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र तायडे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. पुण्यातील कसबा व चिंचवड पोटनिवडणूक २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नेत्यांनी आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी प्रचार रॅली सुरू केली आहे.**




वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र तायडे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. पुण्यातील कसबा व चिंचवड पोटनिवडणूक २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नेत्यांनी आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी प्रचार रॅली सुरू केली आहे. अशातच राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार चिंचवडमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारासाठी आले होते. त्यावेळी देवेंद्र तायडे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश केला.

शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर “भाजपाकडून देशात हुकूमशाही आणण्याचे प्रयत्न सुरू असल्यामुळे भाजपाचा पराभव करणे ही काळाची गरज बनली आहे. मात्र, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष यांनी चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपला पूरक ठरणारी भूमिका घेतल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती”, असे देवेंद्र तायडे म्हणाले.वंचित ही भाजपाची ‘बी’ टीम बनल्याचे सांगत देशातील लोकशाही वाचवायची असल्यास भाजपाला हद्दपार करावे लागेल. त्यामुळे वंचितमधून बाहेर पडत असल्याचे देवेंद्र तायडे यांनी सांगितले.

“भाजपच्या सत्ताकाळात देशातील वंचितांच्या शोषणाची परिसीमा गाठली आहे. त्यामुळे वंचित घटकाच्या संरक्षणासाठी भाजपाला मदत करणारी कोणतीही कृती टाळली पाहिजे, ही कार्यकर्त्यांची भावना होती. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मतांचा आदर करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहे”, असेही देवेंद्र तायडे म्हणाले.

## पुण्यातील कसबा व चिंचवड पोटनिवडणूक 26 फेब्रुवारी रोजी

# चिंचवडमध्ये भगवे वादळ!

## » चिंचवड पोटनिवडणूक : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'रोड शो'ला तुफान गर्दी

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २२) वाकडमध्ये भव्य रोड शो केला. उघड्या गाडीतून लोकांना अभिवादन करत निघाले तेव्हा नागरिकांनी प्रचंड जल्लोषात त्यांचे जंगी स्वागत केले. या रोड शोमुळे महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. विशेषतः तरुणाईची तुफान गर्दी उसळली होती. "कमळ फुलू दे"च्या घोषणाबाजीने तरूणाईने एकच गलका केला होता. रोड शो दरम्यान सर्व रस्ते तुडूंब भरले होते. भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केलेले हे शक्तीप्रदर्शन पोटनिवडणुकीत लक्षवेधी ठरले.**



मुख्यमंत्र्यांसोबत रोड शोमध्ये भाजप-शिवसेना आणि मित्र पक्षाचे अनेक नेते सामील झाले होते. भाजप व मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, खासदार श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार भरत गोगावले, आमदार उमा खापरे, भाजप प्रवक्ते एकनाथ पवार, भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची कन्या ऐश्वर्या जगताप-रेणुसे यांच्यासह भाजप, शिवसेना व मित्रपक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या रोड शोनिमित्त महायुतीच्या वतीने संपूर्ण मार्ग भगवेमय करण्यात आले होते. त्यांच्या रोड शोला तुफान गर्दी उसळली होती. त्यांची एक झलक पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडाली होती. रोड शोच्या मार्गावर नागरिकांनी मुख्यमंत्र्यांचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत केले. रस्त्याने ठिकठिकाणी शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात येत होता. रोड शोमध्ये कमळ फुलू दे आणि भाजपच्या विजयाच्या, महायुतीच्या जयघोषाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सगळीकडे माणसेच माणसे दिसत होती. नजर हटत नाही एवढी गर्दी झाली होती. रस्त्यांवर माणसांचा जत्थाच जत्था दिसत होता. रोड शोच्या मार्गावर प्रत्येक ठिकाणी मुख्यमंत्र्यांवर फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. मुख्यमंत्रीही कधी हात उंचावून, तर कधी हात जोडून मतदारांना अभिवादन करताना दिसत होते.

### मुख्यमंत्र्यांवर फुलांची बरसात...

**» मुख्यमंत्री वाकड येथील दत्त मंदिराजवळील उत्कर्ष चौकात येताच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फुलांची बरसात करत त्यांचे भव्य स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी रोड शोला सुरूवात केली. दत्त मंदिर रोडने थेरगावमधील डांगे चौक, दत्तनगर जुना जकात नाका, चिंचवडमधील चापेकर चौक, गांधीपेठ पॉवर हाउस चौक, केशवनगर, काळेवाडीतील एम. एम. हायस्कूल, कुणाल हॉटेल पासून पुढे विमल गार्डन समोरून शिवेंद्र लॉन्सपर्यंत त्यांनी भव्य रोड शो केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोड शोमध्ये सामील झालेल्या अनेकांशी पुढे येऊन हस्तांदोलन केले. त्यांची छबी मोबाईल कॅमेऱ्याने टिपताना लोक दिसत होते.**

---

# चिंचवड पोटनिवडणुकीला निवडणुकीला गालबोट!

## » शिवसेना ठाकरे गटाच्या शहरप्रमुखावर हल्ला : डांगे चौक आणि परिसरात तणाव

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन भोसले यांच्यासह आणखी एकावर चिंचवडमधील डांगे चौकातील मंगलनगर येथे सायंकाळी हल्ला झाला. महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांचा प्रचार करीत असताना हा प्रकार घडला आहे.**



घटनास्थळी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते पाषाणकर आणि भोसले कार्यकर्त्यांसह प्रचार करीत होते. सायंकाळच्या सुमारास काहीजण तेथे आले. त्यांनी दोघांवर अज्ञात वस्तूने हल्ला केला.

सचिन भोसले यांच्या हाताला दुखापत झाली असून पाषाणकर यांचा पाय मोडला असल्याची माहिती मिळतेय. दोघांनाही उपचारासाठी बाणेर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्ल्याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

दोघांनाही उपचारासाठी बाणेर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, हा हल्ला कोणी केला आणि नेमका कशासाठी केला हे अद्याप समोर आले नाही.

### आम्हाला थेट येऊन मारहाण केली: भोसले

**»चार ते पाच जणांनी हल्ला करून मारहाण करण्यास सुरुवात केली. हे सर्व भाजपाचे कार्यकर्ते आहेत. ज्याने मारहाण केली तो गुंड आहे. आज सुदैवाने बचवलो. वरिष्ठ नेत्यांना याबाबत कळवले आहे. आम्ही प्रचार करत होतो, आम्हाला थेट येऊन मारहाण केली. वैयक्तिक माझे वाद नाहीत. यापूर्वी माझ्या विरोधात भाजपाचा उमेदवार लढला होता, हे त्यांचे कार्यकर्ते आहेत. नियोजन करून मला मारहाण करण्यात आली. शिवीगाळ करून हल्ला केला, असे सचिन भोसले म्हणाले.**

## संपादकीय »

# विद्यार्थी, रीक्षार्थी ते ज्ञानार्थी

***विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि शिक्षणोत्तर व्यावसायिक भवितव्याच्या दृष्टीने दहावी आणि बारावी या इयत्तांच्या परीक्षांना पूर्वीइतके महत्त्व आता राहिलेले नाही हे खरे; परंतु या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या (दोन्ही मिळून सुमारे तीस लाख) शिक्षणाचा विस्तारणारा परीघ दर्शविणारी असल्याने, समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्या महत्त्वाच्या ठरतात.***

या परीक्षांत नव्वद टक्क्यांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण होण्यास सुरुवात होऊनही अनेक वर्षे लोटली. यामुळे गुणवत्ता खालावत असल्याचे गळे काढणारे काही कमी नाहीत. जेव्हा उत्तीर्णांचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास असायचे, तेव्हा यांपैकीच अनेक निम्मे विद्यार्थी का अनुत्तीर्ण होतात, असा प्रश्न करीत. उत्तीर्णांच्या प्रमाणाचा लंबक कोणत्याही दिशेने गेला, तरी त्याच्या विरोधात मत मांडणारे असतातच; त्यामुळे अशा मतांकडे अधिक लक्ष न देता, बारावीच्या निकालाचा अर्थ समजून घ्यायला हवा. परीक्षेला बसणाऱ्या तेरा लाख विद्यार्थ्यांपैकी किती जण त्यांच्या कुटुंबातील बारावीपर्यंत पोहोचणारे पहिलेच आहेत, किती विद्यार्थी उपेक्षित आणि वंचित घटकांतील आहेत, किती जण दुर्गम भागांतील आहेत, अशा सर्वांमधील उत्तीर्णांचे प्रमाण काय आहे; विशेष प्रावीण्य, प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ग या विविध श्रेणींमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे, शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या; तसेच मुलगे आणि मुली यांच्यातील उत्तीर्णांच्या प्रमाणात किती अंतर आहे आदी प्रश्नांचा शोध या निकालातून घेतल्यास शिक्षणाचे सामाजिक संदर्भ समजतात.

गेल्या वर्षी कोव्हिडमुळे बारावीची परीक्षा होऊ शकली नव्हती. अंतर्गत मूल्यांकनाद्वारे निकाल जाहीर करण्यात आला. यंदा कोव्हिडचे सावट कमी झाल्याने परीक्षा घेण्यात आली; परंतु प्रमुख विषयांच्या लेखी परीक्षांत किमान एक दिवसाचा खंड ठेवण्यापासून उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी तीस मिनिटांपर्यंत वेळ वाढवून देण्यापर्यंतच्या सवलती देण्यात आल्या. त्याचबरोबर प्रात्यक्षिकांना बाह्य परीक्षकही नव्हते. या साऱ्याचा परिणाम उत्तीर्णांची टक्केवारी वाढण्यात होणे स्वाभाविक आहे. यंदा उत्तीर्णांचे प्रमाण ९४.२२ टक्के असून, ते २०२०च्या तुलनेत साडेतीन टक्क्यांनी अधिक आहे. मुलींची कामगिरी मुलग्यांपेक्षा चांगली होण्याची परंपरा यंदाही कायम आहे. उत्तीर्णांचे प्रमाण मुलींत ९५.३५, तर मुलग्यांत ९३.२९ टक्के आहे.



## आनंदी सकाळ

# 'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।

पवित्रता ज्या त्यागाहून सहनशीलतेतून प्रकट होते, हे सर्वशील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत. म्हणून भारतीय सौंदर्यबोधही अशा उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे; कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे. नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्याचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे. पुत्र हा कुपुत्र होऊ शकतो; परंतु माता ही कधीच कुमाता होत नाही, असा दृढ विश्वास 'आई' या दोन अक्षरांत आहे. नारदाने भक्तीच्या एकादश आसक्तीत वात्सल्याचा अंतर्भाव केला आहे. संतांनी ईश्वरास, सद्गुरूस माऊली भावाने हाक मारली. 'मातृदेवो भव' ही सार्वकालिक आस्था आहे. भारतीयांनी याच मनोभूमिकेत मातृभूमीस 'आई'च्या उदात्त भावनेने स्वीकारले; त्यामुळे भारतीय अध्यात्म हे सतत सर्वोदय व राष्ट्रोद्धाराशी एकरूप आहे. आत्मज्ञानाचा प्रकाश उजळण्याची व अज्ञान, भ्रममायेने प्रभावित अज्ञानाचा अंधार नाहीसा करण्याची सदिच्छा भारतीय साहित्यात नित्य व्यक्त झाली आहे. ज्ञानाची सुंदर पहाट होण्यासाठी भाव इच्छा, बुद्धी, विचार, आकांक्षा, श्रद्धा, कल्पना आदी शुद्ध विशाल, नि:स्वार्थी, पवित्र, समदर्शी असणे आवश्यक आहे.

# अंगणवाडी सेविकांना केवळ आश्वासनेच!




महिला व बालकल्याणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या महाराष्ट्रातील दोन लाख अंगणवाडी कर्मचारी २० फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जात आहेत. सतत संघर्ष करणाऱ्या म्हणून या महिलांची ओळख महाराष्ट्रातील जनतेला आहे. वर्षांनुवर्षे शासनाच्या सेवेत असूनही त्यांना शासकीय सेवक म्हणून मान्यता नाही. त्या मानधनी सेवक आहेत. शासन या कर्मचाऱ्यांशी असलेले मालक-सेवक नाते मान्य करायला तयार नाही. कामगार कायद्यांचे संरक्षण व लाभ या कर्मचाऱ्यांना मिळत नाहीत. महागाई भत्ता मिळत नाही.

सध्या अंगणवाडी सेविकांना दरमहा सुमारे आठ हजार ३०० रुपये, मिनी



अंगणवाडी सेविकांना पाच हजार ८०० रुपये तर मदतनीसांना चार हजार २०० रुपये मानधन मिळते. २०१७ सालापासून त्यांच्या मानधनात वाढ झालेली नाही, त्यामुळे सध्याच्या महागाईच्या काळात या कर्मचाऱ्यांचे जगणे मुश्कील झाले आहे. महागाई, प्रशासनाची दडपशाही व सरकारची संवेदनशून्यता यांच्या चक्रात अंगणवाडी कर्मचारी अडकल्या आहेत. सात संघटनांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या 'अंगणवाडी कर्मचारी कृती समिती'च्या वतीने मानधनवाढ व अन्य मागण्यांसाठी सतत संघर्ष सुरू आहे. सनदशीर मार्गाने लढणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते. 'आम्ही सकारात्मक आहोत' असे आश्वासन कृती समितीला प्रत्येक आंदोलनाच्या वेळी दिले जाते. तारीख जाहीर होते. ती निघून जाते. कृती समितीला पुन्हा आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागतो. सनदशीर मार्गाने संघर्ष करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करायचे ही केंद्र व राज्य सरकारची नीती आहे. किसान आंदोलनाच्या वेळी देशाने हे अनुभवले आहे. कृती समितीचा संघर्ष या नीतीच्या विरोधात आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने नियोजनाची अर्थव्यवस्था स्वीकारली. कल्याणकारी राज्याचे स्वप्न पाहिले. १९९० पूर्वीच्या पंचवार्षिक योजनांची आखणी याच दृष्टिकोनावर आधारित होती. महिला, बालके, ग्रामीण जनता व शहरातील गरीब माणसांसाठी आजवर अनेक योजना आखल्या गेल्या. त्यासाठी वेगवेगळय़ा खात्यांच्या माध्यमातून कोटय़वधी रुपये खर्च केले गेले. तरीही ना बालकांचे कुपोषण थांबले, ना गर्भवतींचे मृत्यू. त्यामुळे महिला व बालकल्याणासाठी २ ऑक्टोबर १९७५ ला महात्मा गांधींच्या जयंतीच्या दिवशी केंद्र सरकारने 'एकात्मिक विकास योजना' सुरू केली. बालकांचे व महिलांचे आरोग्य, बालकांचे शिक्षण, पोषण आहार इत्यादींसाठी असलेल्या विविध योजना एकत्र करण्यात आल्या.शून्य ते सहा वर्षे वयोगटातील मुलांना आरोग्य, पोषक आहार, शिक्षण देणे ही योजनेची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

# सर्वसामान्यांच्या घराची परवड थांबावी!

**गोरेगावमधील पहाडीसारख्या जागेचा अपवाद सोडल्यास म्हाडाकडे सध्याच्या घडीला मुंबई शहर वा उपनगरात एकाही ठिकाणी मोकळी जागा उपलब्ध नाहीय, त्यामुळे पुनर्विकास प्रकल्पांतूनच अधिकाधिक तयार घरं मिळवणं हा एकच पर्याय सध्या म्हाडासमोर शिल्लक आहे. म्हणूनच प्राधिकरणाने पुनर्विकास प्रकल्प विनाअडथळा कसे राबवता येतील याकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे. त्यांच्या कामाला गती देऊन ते लवकरात लवकर पूर्णत्वाला न्यायला हवेत, तेव्हा कुठे सर्वसामान्यांच्या घरांची परवड थांबू शकेल.**

मुंबईत आपलं स्वत:च्या हक्काचं घर असावं, बैठ्या चाळी किंवा जीर्ण इमारतीची वेस ओलांडून कधी ना कधी नव्या कोऱ्या घरात प्रवेश करावा असं स्वप्न प्रत्येक मुंबईकर उराशी बाळगून असतो. हे स्वप्न साकारण्यासाठी धकाधकीच्या या शहरात तो अव्याहत राबत असतो. परंतु मुंबईसह उपनगरातील जागेची टंचाई, अत्यंत मर्यादित संख्येने उभे राहणारे नवे गृहप्रकल्प आणि खासगी गृहप्रकल्पांतील कोटी कोटींची उड्डाणे घेणाऱ्या घरांच्या किमती ऐकून त्याचा हिरमोड झाल्यावाचून राहात नाही. गृहस्वप्न साकारण्यासाठी उत्सुक असणारे असे असंख्य मुंबईकर दरवर्षी एका गोष्टीची मात्र आतुरतेने वाट बघत असतात,



ती म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अर्थात म्हाडाच्या लॉटरीची. गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी नुकतीच म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या लॉटरीची घोषणा केल्यामुळे सर्वसामान्यांमध्ये आनंदाची लाट पसरलीय.

गोरेगाव येथील पहाडी परिसरात म्हाडाच्या मुंबई मंडळाचा एक प्रकल्प आकारास येतोय. या प्रकल्पाला जितेंद्र आव्हाड यांनी भेट देऊन प्रगतीपथावर असलेल्या कामाची पाहणी केली. हे काम पूर्ण होऊन या सदनिका गृहखरेदीदारांना लवकरच वाटपासाठी खुल्या होतील, कदाचित दिवाळीपर्यंत; याची दाट शक्यता त्यांना वाटत असल्याने या प्रकल्पाला भेट देऊन आल्यानंतर त्यांनी लागलीच दिवाळीत ३ हजार घरांची सोडत निघेल, अशी घोषणा करून टाकली. या घोषणेमुळे सर्वसामान्य गृहखरेदीरांमध्ये नवी उमेद जागी झालीय. अनेकजण पैशांची जुळवाजुळव करण्याच्या तयारीलाही लागलेत. गृहमंत्र्यांच्या घोषणेनुसार सर्वकाही सुरळीत झालंच तर अनेकांची दिवाळी वा नवं वर्ष नव्या घराची चावी हाती घेऊनच साजरं होईल, असं म्हणायला हरकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# फक्त शिवसेनेची नाही तर संविधानाला सुरक्षित ठेवण्यासाठी लढाई!

## » आदित्य ठाकरे: संविधानाला सुरक्षित ठेवण्यासाठी हा निकाल महत्त्वाचा आहे

| मुंबई | महाईन्यूज |

**"सर्वोच्च न्यायालयात धनुष्यबाण आणि पक्ष नावासंदर्भात गांभीर्याने सुनावणी सुरू आहे. निवडणूक आयोगाकडून जो निर्णय आला त्याला आम्ही चॅलेंज केला आहे. आम्हाला वाटतं इलेक्शन कमिशन कॉम्प्रोमाइज झालेला आहे. ही लढाई फक्त आता शिवसेनेची नाही तर संविधानाला सुरक्षित ठेवण्यासाठी हा निकाल महत्त्वाचा आहे. लोकशाहीला सुरक्षित ठेवण्यासाठी हा निकाल महत्त्वाचा आहे", असं ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे म्हणाले आहेत. राज्यातील सत्तासंघर्षाच्या सुनावणीचा आज या आठवड्यातील सलग दुसरा दिवस होता. यावर आपली प्रतिक्रिया देताना ते असं म्हणाले आहेत.**

शिवसेनेचा निधी उद्धव ठाकरे यांनी दुसऱ्या खात्यात वळवला, असा आरोप शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले आहेत की, "जे गद्दार आहे त्यांच्याकडे मी काडीमात्र लक्ष देत नाही, त्यांच्या पक्षसुद्धा त्यांच्याकडे लक्ष देत नाही. चोरीचा माल घेऊन कोणी श्रीमंतच्या लिस्टमध्ये आलेले नाही. त्यांनी नाव पक्ष सगळे चोरू द्या, पण गद्दारीचा शिक्का तसाच राहील."

शिंदे गट आता ठाकरे गटाच्या आमदारांवर व्हिप लागू करू शकतो, अशी चर्चा सुरू होती. मात्र आजच्या सुनावणीत सुप्रीम




कोर्टात शिंदे गटाच्या वकिलांनी पुढील सुनावणीपर्यंत असं केलं जाणार नसल्याचं आश्वासन दिलं आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाल की, "व्हिप ही पूर्णपणे वेगळी गोष्ट झाली, आमची लढाई लोकशाहीसाठी आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी आम्ही अजूनही मित्रच आहोत. सरकार असताना सुद्धा आम्ही कधीही सूडबुद्धीने वागलो नाही."

### 'मुंबईसाठी आम्ही लढत राहू'

».बीएमसी प्रकल्प रद्द केले जास्त असल्यावरून आदित्य ठाकरे म्हणाले की, "मुंबईकरांसाठी आम्ही जे खर्च करत होतो, डेव्हलपमेंट फंड आणत होतो. यांचा डोळा फिक्स डिपॉझिटवर आहे. जेणेकरून ते खर्च करतील आणि दिल्लीश्वरांसमोर झुकवतील. आम्ही जे प्रकल्प राबवणार होतो, ते रद्द करून स्वतःच्या दावोस दौऱ्यावर चाळीस कोटी रुपये 28 तासात खर्च केले. मुंबईकरांसाठीचा पैसा वळवायचा आहे आणि आपल्या तिजोरीत जमा करायचा आहे."

### आमची लढाई लोकशाहीसाठी

» शिंदे गट आता ठाकरे गटाच्या आमदारांवर व्हिप लागू करू शकतो, अशी चर्चा सुरू होती. मात्र आजच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टात शिंदे गटाच्या वकिलांनी पुढील सुनावणीपर्यंत असं केलं जाणार नसल्याचं आश्वासन दिलं आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाल की, "व्हिप ही पूर्णपणे वेगळी गोष्ट झाली, आमची लढाई लोकशाहीसाठी आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी आम्ही अजूनही मित्रच आहोत. सरकार असताना सुद्धा आम्ही कधीही सूडबुद्धीने वागलो नाही."

# "एकनाथ शिंदेंच्या बंडाबाबत राज्यपालांना पूर्ण कल्पना होती

## » कपिल सिब्बल यांचा सर्वोच्च न्यायालयात गंभीर आरोप

| मुंबई| महाईन्यूज |

**शिवसेना कुणाची? १६ आमदारांच्या अपात्रतेचं काय? या सगळ्या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सुनावणीचा दुसरा दिवस असून कपिल सिब्बल हे ठाकरे गटाच्या वतीने जोरदार युक्तिवाद सुरू आहे. आज त्यांनी जेवणानंतरच्या सत्रात एकनाथ शिंदे आणि त्यावेळी राज्यपाल असलेल्या भगतसिंह कोश्यारींवर गंभीर आरोप केले आहेत. एकनाथ शिंदे बंड करणार हे त्यावेळी राज्यपाल असलेल्या भगतसिंह कोश्यारींना माहिती होतं असा गंभीर आरोप कपिल सिब्बल यांनी केला आहे.**

घटनेने राज्यपालांना काही अधिकार दिले आहेत हे मान्य आहेत. मात्र कुठल्या अधिकारात एकनाथ शिंदे यांना राज्यपालांनी शपथ दिली? राज्यपालांकडे बहुमताचा दावा घेऊन जेव्हा एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस आले होते तेव्हा काही गोष्टींचा कपिल सिब्बल यांनी विचार करायला हवा होता. एकनाथ शिंदेंच्या विरोधात अपात्रतेची कारवाई प्रलंबित होती हे माहित असूनही एकनाथ शिंदेंना शपथ द्यायची की नाही याचा विचार करायला हवा होता. ज्या आमदारांना नोटिशीचं उत्तर देण्यासाठी १२ जुलैपर्यंत मुदत होती तर कोश्यारी यांनी एकनाथ शिंदेंना १२ जुलैपर्यंत थांबायला का सांगितलं नाही असा सवालही कपिल सिब्बल यांनी विचारला आहे. एकनाथ शिंदे हे आत्ता मुख्यमंत्री पदावर असले तरीही ज्यावेळी त्यांनी बंड केलं त्यावेळी त्यांची ती कृती चुकीची होती.



### एकनाथ शिंदे यांचं बंड होणार याची राज्यपालांना कल्पना

**» एकनाथ शिंदे हे शिवसेनेत बंड करणार याची कल्पना राज्यपाल असलेल्या भगतसिंह कोश्यारींना होती असाही गंभीर आरोप सिब्बल यांनी कोर्टात केला. राज्यपाल हे घटनात्मक पद असून त्यांनी या पदाचा दुरूपयोग केला असाही आरोप कोर्टात सिब्बल यांनी केला. तसंच एकनाथ शिंदे यांची प्रत्येक कृती पक्षविरोधी होती असंही कपिल सिब्बल यांनी म्हटलं आहे. कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. १६ आमदार हे कसे अपात्र ठरतात हे सांगण्यासाठी त्यांनी एकनाथ शिंदे यांचं उदाहरण दिलं. राज्यपाल असलेल्या भगतसिंह कोश्यारी यांनी घटनेचं पालन केलं नाही. त्यांनी एकनाथ शिंदे यांचं काहीही ऐकायला नको होतं असंही सिब्बल यांनी स्पष्ट केलं.**

# निधी वाटपावरून शिवसेना आणि भाजप आमदारांमध्ये वाद

## सावंतांच्या विरोधात शिंदे-फडणवीसांकडे तक्रार

| सातारा| महाईन्यूज |



मतदारसंघातील निधी वाटपावरून सत्तेत असलेल्या भाजपा आणि शिवसेना आमदारामध्ये वाद निर्माण झाल्याचे समोर आले आहे. भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सचिवांकडे तक्रार केली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात निधी वाटपात असमतोल झाल्याबाबत त्यांनी तक्रार केली आहे. उस्मानाबादचे पालकमंत्री तानाजी सावंत यांच्याविरोधात त्यांनी तक्रारे ली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यासाठी आलेला सर्वाधिक निधी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या भूम परंडा मतदारसंघात गेला आहे. तर भाजप आमदारांच्या आणि इतर मतदारसंघात काहीच निधी मिळाला नाही. भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि प्रधानसचिवांकडे तक्रार केली आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर भाजपच्या आमदारांची नाराजी असल्याचं समोर आले आहे.

### कसा झाला निधी वाटप ?

» उस्मानाबाद जिल्ह्यासाठी यात्रा स्थळांच्या विकासासाठी जिल्हा परिषदेचं अनुदान एकूण 9 कोटी 50 लाख असून त्यापैकी भूम परांडा मतदारसंघासाठी 8 कोटी 60 लाख आणि इतर मतदार संघांसाठी फक्त 90 लाख रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत. म्हणजेच तानाजी सावंत यांच्या मतदारसंघासाठी 90.53 टक्के निधी देण्यात आला आहे. ग्रामीण जिल्हा रस्ते व विकास मजबुतीकरणासाठी एकूण 20 कोटी रुपयांचा निधी आहे, त्यापैकी पूर्ण वीस कोटी तानाजी सावंत यांच्या मतदारसंघात वळवण्यात आला.

# ठाकरेंना मोठा दिलासा!

## 'मशाल' चिन्हाबाबत सुप्रीम कोर्टानं दिला महत्वाचा निर्णय

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**निवडणूक आयोगानं शिवसेनेबाबत दिलेल्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटानं सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. त्यांच्या याचिकेवर आज सुनावणी पार पडली, यामध्ये कोर्टानं ठाकरे गटाला मोठा दिलासा दिला आहे. त्यानुसार, ठाकरे गटाला मशाल हे चिन्ह ही सुनावणी प्रलंबित असेपर्यंत वापरता येणार आहे**




ठाकरे गटाचे वकील ॲड. देवदत्त कामत यांनी मुद्दा उपस्थित केला की, "निवडणूक आयोगानं आम्हाला असं सांगितलं आहे की जोपर्यंत पोटनिवडणूक चालू आहे, म्हणजेच २६ फेब्रुवारीपर्यंतच तुम्हाला मशाल हे चिन्ह आणि तुमचं नाव मिळू शकेल" पण सुप्रीम कोर्टात सध्या या प्रकरणाची सुनावणी सुरु असल्यानं ती संपेपर्यंत तरी आम्हाला चिन्ह आणि नाव वापरण्यास परवानगी मिळावी, अशी मागणी ॲड. कामत यांनी केली.

### ठाकरे गटाला मोठा दिलासा

**सर्वोच्च न्यायालयाने शिंदे गटाच्या वकिलांना विचारले की, या कालावधीत तुम्ही उद्धव ठाकरे गटाच्या आमदारांना व्हिप जारी करणार आहात का? त्यावर शिंदे गटाच्या वकिलाने आम्ही व्हीप काढणार नसल्याचं म्हटलं. यावर न्यायालयाने म्हटलं की तुमचा युक्तीवाद मी रेकॉर्डवर घेतो. अर्थात हा ठाकरे गटाला मोठा दिलासा मानला जात आहे. तसेच त्यांना संरक्षणही मानले जात आहे.**

### व्हिप निघणार नाही



»त्यामुळं आता या काळात शिवसेनेकडून कोणताही व्हिप काढला जाणार नाही. म्हणजेच शिवसेनेच्या व्हिपमुळं ठाकरे गटाचे आमदार अपात्र ठरणार नाहीत. तसेच ठाकरे गटाचं मशाल हे चिन्ह २६ फेब्रुवारीनंतरही सुप्रीम कोर्टाचा पुढचा निर्णय येईपर्यंत हे त्यांच्याकडं कायम राहिलं. तसेच सरन्यायाधीश हे प्रकरण देखील स्वतःच्या अधिकारात ऐकणार आहे.

### निवडणूक आयोगाचा निर्णय 'जैसे थे'

**» ॲड. कामत यांच्या या मागणीवर सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी यावर होकार दर्शवला. तसेच यासंदर्भात आदेश दिला की, दोन आठवड्यांनंतर यावर सुनावणी होईल. त्यामुळं पुढील सुनावणीपर्यंत निवडणूक आयोगाचे जे आदेश आहेत त्यामध्ये ठाकरे गटाला काही सुरक्षा दिली जाईल. म्हणजेच काही अटींसह कोर्टानं निवडणूक आयोगाचा निर्णय 'जैसे थे' असाच ठेवला आहे.**

---

# जातीय भेदभावाला प्रतिबंधित करणारे सिएटल अमेरिकेचे पहिले शहर!

## सामाजिक कार्यकर्त्या क्षमा सावंत यांचा पुढाकार

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

अमेरिकेच्या शहराने भेदभावविरोधी कायद्यामध्ये आता जातीआधारीत भेदवाव देखील जोडला आहे. त्यामुळे जातिभेदला अवैध ठरविणारे सिएटल हे अमेरिकेतील पहिले शहर ठरले आहे. जातिभेदाच्या विरोधातील लढा हा सर्व प्रकारच्या दडपशाहीविरोधातील लढ्याशी निगडीत आहे, असे भारतीय अमेरिकन नागरिक आणि सिएटल शहर परिषदेच्या सदस्या क्षमा सावंत यांनी सांगितले. या निर्णयामुळे सिएटल शहरातील भारतीय नागरिकांना याचा लाभ होऊ शकतो.

क्षमा सावंत पुढे म्हणाल्या की, जातिव्यवस्था हजारो वर्षांपूर्वीची आहे आणि उच्च जातींना अनेक विशेषाधिकार याच्या माध्यमातून मिळतात. मात्र खालच्या जातींना पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नव्हते. दलित समाज हा हिंदू जातिव्यवस्थेमधील सर्वात खालच्या स्तरावर असल्यामुळे त्याला अस्पृश्य म्हणून वागविले गेले. अमेरिकेतील दक्षिण आशियाई अमेरिकन आणि इतर स्थलांतरीत



कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी, जसे की तंत्रज्ञान क्षेत्र असेल किंवा इतर क्षेत्र असेल सिएटल आणि अमेरिकेच्या अनेक शहरांमध्ये जातीभेदाला सामोरे जावे लागते, असेही क्षमा सावंत यांनी जातीभेदाच्या विरोधी प्रस्ताव सादर करत असताना सांगितले.

क्षमा सावंत या सिएटलमधील सामाजिक कार्यकर्त्या आहेत. सामाजिक न्यायासाठी त्या संघर्ष करत असतात. सिएटल शहर परिषदेच्या त्या २०१४ पासून सदस्या आहेत. कामगार, युवक आणि पिचलेल्या समाज घटकांसाठी त्या आवाज उचलत असतात.भारतात ७० वर्षांपूर्वी जातिभेद बेकायदेशीर ठरवला गेला आहे. तरिही अनेक प्रकरणांमध्ये जातिभेदाचा विषय डोकावत असल्याचे समोर आलेले आहे. अलीकडील वर्षात केलेल्या अभ्यासानुसार जातिव्यवस्थेच्या खालच्या स्तरावर असलेले लोक हे मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांमध्ये कमी प्रतिनिधित्व करत असल्याचे दिसले आहे, अशी माहिती इंडिया टुडे या वेबसाईटने दिली आहे.

क्षमा सावंत म्हणाल्या, भारताने अस्पृश्यतेवर बंदी घातली असली तरीही दलितांना आजही भारतात अत्याचारांना बळी पडावे लागत आहे. दलित समाजाची प्रगती रोखण्यासाठी कधी कधी हिंसेचा आधार घेतला जातो. जातिव्यवस्थेची विषमतेवर आधारीत असलेली उतरंड ही भारतात आणि परदेशात वादग्रस्त आहे, तसेच

-

**»क्षमा सावंत या सिएटलमधील सामाजिक कार्यकर्त्या आहेत. सामाजिक न्यायासाठी त्या संघर्ष करत असतात. सिएटल शहर परिषदेच्या त्या २०१४ पासून सदस्या आहेत. कामगार, युवक आणि पिचलेल्या समाज घटकांसाठी त्या आवाज उचलत असतात.**

---

# शाळेतील इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी ६ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक!

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

शालेय नव्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या पालकांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. कारण इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी केंद्र सरकारने मुलांच्या वयोमर्यादेत वाढ केली आहे. त्यानुसार, वयवर्षे 6 पूर्ण असलेल्या मुलांना इयत्ता पहिलीसाठी प्रवेश मिळणार आहे. याबाबत केंद्र सरकारने माहिती दिली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये देशाचे राष्ट्रीय प्राधान्य म्हणून ‘प्रारंभिक टप्प्यातच’ मुलांना योग्य शिक्षण मिळावे अशी शिफारस करण्यात आली आहे. मुलांच्या जडणघडणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात सर्व मुलांसाठी 5 वर्षांचा काळ (3 ते 8 वर्षांच्या दरम्यान) अनेक गोष्टी शिकण्याचा असतो. ज्यामध्ये 3 वर्षांचे पूर्व-प्राथमिक शिक्षण आणि 2 वर्षांचे बालवाडी शिक्षण ग्रेड – I आणि ग्रेड-II यांचा समावेश होतो. अशा प्रकारे बालवाडी पासून इयत्ता दुसरी पर्यंत मुलांच्या अखंड शिक्षण आणि विकासाला हे धोरण प्रोत्साहन देते. यासाठी अंगणवाड्यांमध्ये किंवा सरकारी/सरकारी अनुदानित, खाजगी आणि स्वयंसेवी संस्थाद्वारे चालवल्या



जाणाऱ्या बालवाडी केंद्रांमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलांसाठी तीन वर्षांच्या दर्जेदार प्रीस्कूल शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करणे गरजेचे आहे. याशिवाय, प्रारंभिक टप्प्यातील सर्वात महत्त्वाचा घटक पात्र शिक्षकांची उपलब्धता हा आहे. ते वय आणि विकासाच्या दृष्टीने योग्य अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र या बाबतीत विशेष प्रशिक्षित असण्याची अपेक्षा आहे. प्रारंभिक टप्प्यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF-FS) अलिकडेच 20 ऑक्टोबर 2022 रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने डी.ओ. पत्रानुसार सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना प्रवेशाचे वय धोरणानुसार संरेखित करण्यासाठी आणि 6 वर्षे पूर्ण वयाच्या मुलांना इयत्ता पहिलीसाठी प्रवेश देण्याच्या निर्देशांचा पुनरुच्चार केला आहे. तसेच राज्यांना त्यांच्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात दोन वर्षांचा डिप्लोमा इन प्रीस्कूल एज्युकेशन (DPSE) अभ्यासक्रम तयार करण्याची आणि चालवण्याची प्रक्रिया सुरू करण्याची सूचना केली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) द्वारे हा अभ्यासक्रम तयार केला जाणे अपेक्षित आहे.

आणि ते एससीईआरटीच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थाद्वारे चालवले जाणे/अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

# मृणाल दुसानिस चे फोटो, लूक इतका बदललाय कि ओळखू शकणार

अभिनेत्री मृणाल दुसानिसने सध्या मनोरंजन विश्वातून ब्रेक झालीय. मृणाल तिच्या कुटुंबासोबत अमेरिकेत राहते. मृणाल सोशल मीडियावर त्याच्या फॅमिलीसोबतचे अनेक फोटो शेयर करत असते.लग्नानंतर मृणाल बदलली असून खूप दिवसांनी तिचे आणि तिच्या कुटुंबाचे फोटो समोर आलेत. यात मृणालची हेयरस्टाईल बदलली असून तिची लेक सुद्धा आता मोठी झालीय.नवरा नीरज आणि मुलगी नुरवी सोबत मृणाल हवाईला ट्रिपला गेलीय. मृणाल आणि तिचं कुटुंब वेळात वेळ काढत अमेरिकेतील हवाईला पिकनिकला गेलीय.मृणाल आणि नीरजने काल पांढऱ्या रंगाचा खास वॅकेशन मोड कपडे परिधान केले आहेत. मृणाल आणि तिची मुलगीही फोटोत दिसत असून मृणालची मुलगी नुरवी आता मोठी झालीय. मृणाल दुसानीस आता जरी काम करत नसली तरी तिचं फॅन फॉलोईंग काही कमी झालं नाही. मृणालने छोट्या पडद्यावर तू तिथ मी, सुखाच्या सरींनी हे मन बावरे, माझिया प्रियाला प्रीत कळेना, अस्स सासर सुरेख बाई अशा लोकप्रिय मालिका केल्या. मृणालने २०१६ ला नीरज मोरे सोबत लग्न केलं. नीरज हा पेशाने सॉफ्टवेयर इंजिनियर आहे. लग्नानंतर





# ऋता दुर्गुळे लवकरच करणार मोठी घोषणा

'फुलपाखरु' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री म्हणून ऋता दुर्गुळेला ओळखलं जाते. ऋताने 'फुलपाखरु' या मालिकेतून प्रेक्षकांची मने जिंकली. ती नेहमीच काही ना काही कारणामुळे चर्चेत असते. मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक अशी तिची ओळख आहे.'अनन्या', 'टाईमपास ३' या दोन्ही चित्रपटांमुळे ती अजूनही प्रसिद्धीझोतात आहे. त्यानंतर आता लवकरच ऋता ही एक मोठी घोषणा करणार आहे. ऋता दुर्गुळे ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. ती नेहमीच विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना अपडेट देताना दिसते. नुकतंच ऋताने इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे. यात ती गोड हसताना दिसत आहे. त्याबरोबरच तिने दिलेल्या कॅप्शनने सर्वांचेच लक्ष वेधले आहे. तिने दिलेल्या हॅशटॅगनंतर ती काहीतरी मोठी घोषणा करणार असल्याचे बोललं जात आहे. ऋताची ही घोषणा नेमकी कशाबद्दल आहे, याबद्दल विविध तर्कवितर्क लावले जात आहे. तिचे अनेक चाहते याबद्दल अंदाज वर्तवतानाही दिसत आहेत.

# तुझ्या सौंदर्याचे रहस्य काय? प्रश्नाला रश्मिकाने दिलं हे मजेशीर उत्तर

रश्मिका ही अतिशय सुंदर आणि लोकप्रिय अभिनेत्री आहे. रश्मिकाने दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आपला दमदार अभिनय सिद्ध केला आहे, तर ती अनेक बॉलिवूड चित्रपटांमध्येही दिसली आहे. रात्री उशिरा अभिनेत्री विमानतळावर दिसली. रश्मिका मुंबईहून मिलानला निघाली होती.

'मिशन मजनू' अभिनेत्री मिलान फॅशन वीकमध्ये सहभागी होणार आहे. त्याचवेळी एअरपोर्टवर पापाराझींनी रश्मिकाला तिच्या सौंदर्याचे रहस्य विचारले असता, अभिनेत्रीने मजेदार उत्तर दिले. रश्मिका एअरपोर्टवर ब्लॅक लूकमध्ये दिसली. अभिनेत्रीने साधा काळ्या रंगाचा स्वेटशर्ट आणि पँट घातली होती. रश्मिकाने तिचे केस बनमध्ये बांधले होते आणि मिनिमल मेकअप मेकअप केला होता. साध्या लूकमध्येही अभिनेत्री कमालीची दिसत होती. रश्मिकाला पाहताच पापाराझींनीही तिचे फोटो जबरदस्त क्लिक केले. यादरम्यान पापाराझींनी अभिनेत्रीला विचारले की तुझ्या सौंदर्याचे रहस्य काय आहे? हे ऐकून अभिनेत्री लाजली आणि म्हणाली, "स्माइल... आप, आप हो राज." यानंतर पापाराझींनी रश्मिकाचे कौतुक केले आणि म्हणाले, "तुझे स्माईल खूप गोड आहे, लव्ह यु मॅडम." यावर अभिनेत्रीने 'लव्ह यू' म्हंटले.

रश्मिका शेवटची शांतनु बागची दिग्दर्शित 'मिशन मजनू' चित्रपटात सिद्धार्थ मल्होत्रासोबत दिसली होती. हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित झाला होता. ही अभिनेत्री लवकरच 'ॲनिमल' या मोस्ट अवेटेड चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन संदीप रेड्डी वंगा यांनी केले आहे.

चित्रपटात रणबीर कपूर, अनिल कपूर आणि बॉबी देओल यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले असून 'ॲनिमल' 11 ऑगस्ट 2023 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. रश्मिकाने नीना गुप्ता आणि अमिताभ बच्चन यांच्यासोबत गुडबाय या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले.



# अरे जरा हळू तिची कंबर लचकेल! रणबीर-श्रद्धा

रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर हे दोघही त्याच्या आगामी चित्रपट 'तू झुठी में मक्कार' सिनेमामुळं चर्चेत आहे. या चित्रपटाची दोन गाणी रिलीज झाली ज्याला प्रेक्षकांनी खुप डोक्यावर घेतलं. आता या सिनेमाचं 'शो मी द ठुमका' हे गाणं नुकतच रिलिज झालं. साडेतीन मिनिटांच्या या गाण्यात रणबीरला नाचताना पाहून तुम्हाला 'ये जवानी है दीवानी' हे गाणे नक्कीच आठवेल. तर दुसरीकडे श्रद्धा तिच्या सडपातळ कंबरेने सर्वांना वेड लावताना दिसत आहे. पिवळ्या रंगाची साडी परिधान केलेली श्रद्धा जबरदस्त डान्स करताना दिसत आहे. हे गाणे सुनिधी चौहान आणि शाश्वत सिंग यांनी गायले आहे. या गाण्याचे बोल अमिताभ भट्टाचार्य यांचे आहेत.

आता या गाण्याला नेटकऱ्यांच्या समिश्र प्रतिक्रिया येतांना दिसत आहे. एकीकडे चाहत्यांना त्यांची जोडी खुप आवडत आहे तर दुसरीकडे या गाण्याच्या डान्स स्टेपमुळं वेगळीच चर्चा सुरु झाली आहे. यात रणबीर श्रद्धाला पकडून डान्स स्टेप करत आहे. ही स्टेप पाहिल्यानंतर नेमकं दोघांना करायचं काय आहे असा प्रश्न नेटकऱ्यांना पडलाय. काहींनी गाण्याच्या कोरियोग्राफरलाही चांगलचं सुनावलं आहे. काही नवं करण्याच्या नादात जे आहे तेही बिघडलं आहे असंही नेटकरी म्हणतं आहे. यापूर्वी या चित्रपटातील 'प्यार होता कई बार' हे गाणे रिलीज झाले होते.

या चित्रपटात रणबीर कपूर पहिल्यांदाच अभिनेत्री श्रद्धा कपूरसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या चित्रपटात श्रद्धा आणि रणबीर व्यतिरिक्त डिंपल कपाडिया, बोनी कपूर आणि आयशा रझा मिश्रा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. तू झुठी मैं मक्कर मधून स्टँड-अप कॉमेडियन अनुभव सिंग बस्सीही पदार्पण



# क्रिकेटमधील 87 वर्षापूर्वीचा विक्रम मोडला!

## 40 वर्षाच्या खेळाडूने ऑस्ट्रेलियाला दिला जबरी झटका

।दुबई।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून दर बुधवारी ताजी क्रमवारी जाहीर केली जाते. आज २२ फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या क्रमवारीत एक मोठा बदल झाला आहे. कसोटी क्रिकेटमधील गोलंदाजांच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिंन्सने अव्वल स्थान गमावले आहे. भारताविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला. या दोन्ही कसोटीत ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंची कामगिरी खराब झाली होती. याचा फटका कर्णधाराला देखील बसला.**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या प्रमाणेत इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिल्या कसोटीतील धमाकेदार कामगिरीचा फायदा इंग्लंडचा सर्वात अनुभवी गोलंदाज जेम्स ॲंडरसनला झाला. ४० वर्षीय ॲंडरसनने कसोटी क्रमवारीत अव्वल स्थान मिळवले आहे.

इंग्लंडचा दिग्गज गोलंदाज अशी ॲंडरसनची ओळख आहे. ज्या वयात इतर गोलंदाज निवृत्त होतात, पण ॲंडरसनच्या गोलंदाजीची धार कमी झाली नाही. न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत जगाने पुन्हा एकदा त्याचा अनुभव घेतला. ॲंडरसनने पहिल्या कसोटीत ७ विकेट घेतल्या. याचा फायदा त्याला आयसीसी क्रमवारीत झाला. क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचणारा तो जगातील सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. याआधी हा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या क्लेरी ग्रिमेट यांनी केला होता. ग्रिमेट हे १९३६ मध्ये ४०व्या वर्षी अव्वल स्थानी होते. आता ८७ वर्षांनंतर ॲंडरसनने हा इतिहास पुन्हा घडवला. आयसीसी क्रमवारीत भारताचा फिरकीपटू आर अश्विनला देखील फायदा झाला. दुसऱ्या कसोटीत अश्विनने शानदार कामगिरी केली होती. अश्विन आता क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ॲंडरसन आणि अश्विनमध्ये फक्त दोन गुणांचा फरक आहे. जर तिसऱ्या कसोटीत अश्विनने पुन्हा एकदा दमदार कामगिरी केली तर तो अव्वल स्थान देखील मिळवू शकतो. क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा कर्णधार कमिंन्सला मोठा फटका बसला आहे. क्रमवारीत तो तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. भारताविरुद्धच्या पहिल्या दोनही कसोटीत त्याची कामगिरी खराब झाली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत भारताने २-० अशी आघाडी घेतली असून आता टीम इंडिया ही मालिका गमवणार नाही हे निश्चित झाले आहे.

### क्रमवारीत कमिंन्सला मोठा फटका

**»आयसीसी क्रमवारीत भारताचा फिरकीपटू आर अश्विनला देखील फायदा झाला. दुसऱ्या कसोटीत अश्विनने शानदार कामगिरी केली होती. अश्विन आता क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ॲंडरसन आणि अश्विनमध्ये फक्त दोन गुणांचा फरक आहे. जर तिसऱ्या कसोटीत अश्विनने पुन्हा एकदा दमदार कामगिरी केली तर तो अव्वल स्थान देखील मिळवू शकतो. क्रमवारीत ऑस्ट्रेलियाचा कर्णधार बसला आहे. क्रमवारीत तो तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. भारताविरुद्धच्या पहिल्या दोनही कसोटीत त्याची कामगिरी खराब झाली आहे.**




# IPLआधीच झाला धमाका, भारतीय खेळाडूची वादळी फलंदाजी

## 55 चेंडू, 17 षटकार, कुटल्या इतक्या धावा

।मुंबई।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी सुरू आहे. कसोटी मालिकेच्या दरम्यान भारतात आयपीएल २०२३ची तयारी सुरू आहे. आयपीएलचा नवा हंगाम सुरू होण्यास अजून बराच कालावधी आहे. पण त्याआधी एक स्फोटक खेळी पाहायला मिळाली आहे. मुंबईत डीवाय पाटील टी-२० कप ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेतील एका सामन्यात अशी फलंदाजी पाहायला मिळाली जी आयपीएल किंवा आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये अपवादाने पाहायला मिळते.**

डीवाय पाटील स्पोर्ट्स कॉम्पेक्समध्ये झालेल्या सामन्यात प्रभसिमरन सिंहने चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला. 'कॅग' संघाकडून फलंदाजी करताना त्याने इनकम टॅक्स संघाच्या गोलंदाजांची बेदम धुलाई केली. आयपीएलमध्ये प्रभसिमरन पंजाब किंग्ज संघाकडून खेळतो. या सामन्यात त्याच्या वादळी फलंदाजीमुळे तिघा गोलंदाजांनी ५० हून अधिक तर रवी जांगिडने ३ ओव्हरमध्ये ६० धावा दिल्या.

प्रभसिमरनने फक्त ५५ चेंडूत १७ षटकार आणि ९ चौकारांसह १६१ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर कॅगच्या संघाने ६ बाद २६७ धावांचा डोंगर उभा केला.

सामन्यात कॅगने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रभसिमरन आणि रामसिंह संजय यांनी डावाची सुरूवात केली. एका बाजूने विकेट पडत असताना प्रभसिमरन मात्र षटकार, चौकारांचा पाऊस पाडत होता. त्याने ५५ चेंडूत १६१ धावा केल्या. त्याला धनैत राऊतने बाद केले. प्रभसिमरनने २९२.७३च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. कॅगकडून संजयने ३५, अंकित कौशिकने २० धावांचे योगदान दिले.

उत्तराखल इनकम टॅक्स संघाची सुरुवात खराब झाली.



### रवी जांगिडच्या 3 ओव्हरमध्ये 60 धावा

**» डीवाय पाटील स्पोर्ट्स कॉम्पेक्समध्ये झालेल्या सामन्यात प्रभसिमरन सिंहने चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला. 'कॅग' संघाकडून फलंदाजी करताना त्याने इनकम टॅक्स संघाच्या गोलंदाजांची बेदम धुलाई केली. आयपीएलमध्ये प्रभसिमरन पंजाब किंग्ज संघाकडून खेळतो. या सामन्यात त्याच्या वादळी फलंदाजीमुळे तिघा गोलंदाजांनी ५० हून अधिक तर रवी जांगिडने ३ ओव्हरमध्ये ६० धावा दिल्या.**

# ऑस्ट्रेलियाला मिळणार बुस्टर...

## भारताचा कर्दनकाळ होणार आता बुडत्या जहाजाचा मार्गदर्शक

। नवी दिल्ली ।महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

ऑस्ट्रेलियाचे जहाज आता भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत बुडायला लागले आहे. एक जरी सामना त्यांनी गमावला तर त्यांना मालिकेत बरोबरीही करता येणार नाही. पण ऑस्ट्रेलियाला आता एक दमदार बुस्टर मिळणार आहे. कारण ऑस्ट्रेलियाच्या बुडत्या जहाजासाठी भारताचा एकेकाळी कर्दनकाळ ठरलेला खेळाडू पुढे सरसारवला आहे आणि तो त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तयार झाला आहे.

ऑस्ट्रेलियाने दोन्ही कसोटी सामने तीन दिवसांतच गमावले. ऑस्ट्रेलियाची फलंदाजी करत पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळत असल्याचे सर्वांनीच पाहिले आहे. एका दिवसताच ऑस्ट्रेलियाचा संघ ऑल आऊट झाल्याचे पाहायला मिळाले आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियाची फलंदाजी हा त्यांच्यासाठी सर्वात गंभीर विषय आहे. पण आता ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीला बुस्टर देण्यासाठी भारताला त्यांच्याच मातीत धुळ चारणारा खेळाडू पुढे आला आहे.

ऑस्ट्रेलियाने जर यापुढील दोन्ही सामने जिंकले तर त्यांना मालिका बरोबरीत सोडवता येऊ शकते. त्यासाठी त्यांची फलंदाजी सक्षम होणे गरजेचे आहे. या गोष्टीसाठी आता ऑस्ट्रेलियाचा माजी धडाकेबाज सलामीवीर मॅथ्यू हेडन पुढे आला आहे. सध्याच्या घडीला हेडन हा समालोचक म्हणून काम करत आहे. पण समालोचन करत असताना हेडनने आता आपण ऑस्ट्रेलियाच्या संघाला कधीही मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले आहे. हेडन २००१ साली संघासहीत भारताच्या दौऱ्यावर आला होता तेव्हा त्याने ११० च्या सरासरीने धावा केल्या होत्या. त्यानंतर २००४ साली ऑस्ट्रेलियाच्या संघाबरोबरही तो भारताच्या दौऱ्यावर आला होता.